# आशियाई देशापुढील लोकशाहीची आव्हाने

संशोधक विद्यार्थी ऋतुराज किशोर माने,राज्यशास्त्र अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**सारांश**

प्रस्तुत शोधनिबंध हा आशियाई देश आणि लोकशाही या संदर्भातील आहे. जगामध्ये प्रमुख असे ५ खंड आहेत. आशिया, आफ्रिका, अमेरिका, युरोप व अंटार्क्टिका इ. यामध्ये युरोप व अमेरिका हे खंड प्रगत व पुढारलेले मानले जातात. कारण बहुतांश वहसातवादी, साम्राज्यवादी देश हे याच खंडातील होते. उदा. स्पेन, पोर्तुगाल, इंग्लंड, जर्मनी इत्यादी १८ व्या शतकापासून जगामध्ये विविध खंडात नव्या स्वतंत्र राष्ट्रांचा जन्म होऊ लागला. वसाहतवाद दुबळा होत गेल्यानंतर जगामध्ये आशिया - आफ्रिका खंडात स्वतंत्र चळवळ निर्माण झाली. मानवी जीवनामध्ये राष्ट्रवाद, व्यक्ती स्वातंत्र्य, प्रतिष्ठा, मानवी हक्क, प्रगती व सन्मान या तत्त्वांना महत्त्व प्राप्त झाले.

जगातील सर्वाधिक लोकसंख्या व मानवी मनुष्यबळ सामावलेला आशिया खंड हा तसा जगातील एक लक्षवेधी व संवेदनशील खंड आहे. आशिया खंडामध्ये १९ व्या शतकानंतर मोठ्या प्रमाणावर उलथा - पालथी घडल्या. आशिया खंडाचा अभ्यास करताना लक्षात येते की, क्षेत्रफळानुसार सात खंडांचा क्रम पुढीलप्रमाणे - १) आशिया (सर्वाधिक क्षेत्र २९.५%), २)आफ्रिका ३) युरोप ४) उत्तर अमेरिका ५) दक्षिण अमेरिका ६) अंटार्क्टिका ७) युरोप ८) ऑस्ट्रेलिया इ. याचबरोबर लोकसंख्येनुसार सात खंडांचा क्रम

१) आशिया २) आफ्रिका ३) युरोप ४) उत्तर अमेरिका ५) दक्षिण अमेरिका, ६) ऑस्ट्रेलिया ७) अंटार्क्टिका

**जगातील सर्वात मोठी द्वीपकल्पे** – १) आशियातील अरेबियन द्वीपकल्पे, २) भारतीय द्वीपकल्पे

१) आशिया खंडाचे विभाग पुढील प्रमाणे -

आशियाचे विभाग व त्यातील प्रमुख देश पुढील प्रमाणे -

१) पश्चिम आशिया – टर्की, इस्राईल, सिरीया, लेबनॉन, इराक, इराण, जॉर्डन, सौदी अरेबिया, सायप्रस, कुवेत, जॉर्जिया
२) पूर्व आशिया – चीन, जपान, उत्तर व दक्षिण कोरिया, तैवान, हॉंगकॉंग, मकाऊ
३) उत्तर आशिया – कझाकिस्तान, उजबेकीस्तान, तुर्कमेनिस्तान, ताजीकिस्तान, किरगीझीस्तान, सैबेरिया
४) उत्तर आशिया - वरील राष्ट्रे
५) दक्षिण आशिया – भारत, पाक, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, भूतान, मालदीव, अफगान (सार्क राष्ट्रे)
६) आग्नेय आशिया – म्यानमार, थायलंड, व्हिएतनाम, मलेशिया, इंडोनेशिया, ब्रुनेई, कंबोडिया, कोकोबेटे

वरील प्रमाणे राष्ट्रे आशिया खंडात समाविष्ट आहेत. याच आशिया खंडात मागील ७५ वर्षात रुजलेली लोकशाही निरनिराळ्या कारणाने धोक्यात आहे. यामध्ये अनेक समस्या व धोके तयार झालेले आहेत या शोध निबंधात याच विषयावर विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रमुख शोध शब्द**

यादवी, अस्थिरता, हिंसा, जमातवाद, आर्थिक अरिष्ट, नवसम्राज्यवाद, वर्चस्व

**प्रस्तावना**

आशिया शब्दाची उत्पत्ती ही हिब्रु भाषेतील आसू या शब्दापासून झालेले आहे. आसू म्हणजे उगवता सूर्य. जगाची जवळपास ३०% क्षेत्रफळ या खंडाने व्याप्त आहे. जगातील ही सर्वात मोठे बेट आहे. या खंडावरून ३ प्रमुख अक्षांशीय वृत्त, विषुववृत्त, कर्क तसेच आर्कटिक जातात. आशियाच्या उत्तरेला आर्कटिक महासागर, दक्षिणेला हिंदी महासागर, पूर्वेला प्रशांत महासागर आहे, पश्चिमेला युटाल पर्वत, कॅस्पियन सागर, काळा समुद्र व भूमध्य समुद्र एशिया युरोपची सीमारेष बनते.

लाल समुद्र आणि सुयेज कालवा आशियाला आफ्रिकेपासून विलग करतो. चीन व भारत हे जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणारे देश आहेत.

आशिया खंडाची भौगोलिक व प्राकृतिक रचना लक्षात घेतल्यास आपल्याला येथील प्रमुख समस्या आव्हाने व संधी लक्षात येतात. कारण आशिया हा खंड खनिजे तेल, वनसंपत्ती, पीके, शेती, पाणी, वन्यजीव यांनी समृद्ध आहे. आशिया खंडातील देश हे १९५० नंतर मोठ्या प्रमाणावर स्वतंत्र झालेले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर या खंडात नवीन नेतृत्व व नवी विचारसरणी तयार झाली. उदा समाजवाद साम्यवाद दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर ज्या घडामोडी घडत गेल्या व त्यांचा परिणाम कसा आशिया देशावर होत गेला. भारतासह पाक, श्रीलंका, नेपाळ, भूतान, तिबेट, मालदीव, चीन, अफगाण इत्यादी राष्ट्रे यामध्ये प्रमुख सहभागी आहेत.भारताच्या स्वातंत्र्यानंतर आशिया खंडात १९४९ साली चीन, १९७१ साली

बांगलादेश, १९६३ साली श्रीलंका, इत्यादी राष्ट्रीय स्वतंत्र झाली. भारतामध्ये संसदीय लोकशाही शासन व्यवस्था रुजली, तर पाकमध्ये लष्करशाही रुजली. आशियाई देशांमध्ये भारत, चीन, पाक, श्रीलंका, अफगान, म्यानमार, थायलंड, कझाकिस्तान, ताजीकिस्तान, मालदीव, इंडोनेशिया, नेपाळ इत्यादी राष्ट्रांमध्ये सर्वाधिक परिणामकारक घटना दिसत आहेत. हा शोधनिबंध आशियातील प्रमुख देशातील लोकशाही व सद्यस्थिती अभ्यासणार आहे.

**उद्दिष्टे :**

प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे -

१) आशियाई देशांचा अभ्यास करणे.

२) आशियाई देशातील शासनप्रणाली, प्रशासन, लष्कर यांचा अभ्यास करणे.

३) आशियाई देशातील लोकशाही शासन प्रणालीचे धोके व आव्हाने अभ्यासणे.

४) आशियाई देशातील समस्यांचा अभ्यास करणे.

**विषय विवेचन:**

आशिया खंडातील प्रमुख व विकसनशील देशासमोरील विविध आव्हाने आज गंभीर स्वरूप धारण करित आहेत. उत्तर आशिया, दक्षिण आशिया, अग्नेय आशिया, पश्चिम आशिया, पूर्व आशिया या विविध विभागातील देशांच्या लोकशाही समोरील प्रमुख आव्हाने पुढील प्रमाणे -

परकीय शक्तींचा हस्तक्षेप

आशियाई देशातील लोकशाही समोरील प्रमुख धोका म्हणजे अमेरिका चीन रशिया फ्रान्स कॅनडा सौदी इंग्लंड या देशाचा स्वहितासाठी होणारा हस्तक्षेप. हा परकीय हस्तक्षेप या छोट्या लहान लोकशाहीच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणार आहे. परकीय शक्ती राजकीय अस्थिरता व उलथापालक घडवून आणतात. परकीय शक्ती व त्यांच्या गुप्तहेर संस्था कट कारस्थाने घडवतात.

उदा. बांगलादेश मधील राजकीय बदल, तैवान कोरियामधील अमेरिकेचा हस्तक्षेप

**गरिबी बेरोजगारी व विषमता :**

अशी दिशा समोरील सर्वात जुनाट व घातक समस्या म्हणजे या सामाजिक समस्या व प्रश्न. कारण एखाद्या राष्ट्राचे हित - संतुलन व शांतता या बाबी त्या राष्ट्राच्या संतुलित व समन्यायी प्रगतीत लपलेल्या असतात. आशियातील बहुतांश देश हे गरीब, विषमतापूर्ण व असमान विकास प्रक्रियेच्या चक्रात गुरफटलेले आहेत. यामुळे या देशातील मागास समाज घटक यादी व असंतोषाला लवकर बळी पडतो. गुन्हेगारी वाढते, लोकनियुक्त शासनावरील विश्वास उडतो, हिंसाचार होतो.

**धर्मांधता – जमातवाद:**

आशियाई देशात विशेष इस्लामिक देशात धर्मनिष्ठ व जमातवादी राजकारणाला बळ मिळत आहे. उदा. पाकिस्तान, तुर्कस्तान, इंडोनेशिया, मालदीव, बांगलादेश

धर्माचा वापर राजकारणासाठी व सत्ता प्राप्तीसाठी करणे, धर्माचा वापर राजकारणासाठी व सत्ता प्राप्त साठी करणे. राष्ट्राच्या समाज जीवनात धार्मिक आधारावर भेदभाव करणे, धार्मिक आधारावर दंगली घडून आणणे, बहुसंख्यांकांचे राजकारण करित अल्पसंख्यांकांना दुर्लक्षित करणे, राष्ट्राच्या सर्वोच्च निर्णय प्रक्रियेत धर्मगुरू जमीनदार उद्योगपती श्रीमंत लोकांचा भरणा असणे. यामुळे समाजात दुही निर्माण होते. शासनात अपारदर्शकता व भ्रष्टाचार वाढतो. सामान्य लोकांचा विश्वास गमावला जातो. यातून त्या देशातील लोकशाही ढासळते, दर्जाहीन होते, राजकीय हस्तक्षेप वाढतो.

**उजवी, सनातनी व प्रतिगामी पक्ष:**

आशिया देशातील सर्वात मोठा धोका म्हणजे उजवे व प्रतिगामी विचारसरणीचे राजकीय पक्ष होय. उदा. जमाती इस्लामी, गजवा - ए - हिंद इ. हे पक्ष समाजात दहशत, भय व द्वेष - तिरस्कार निर्माण करतात. सूडबुद्धीचे राजकारण रुजवितात, समाजात व देशात घातक पायंडे पाडतात. यातून त्या देशातील एकात्मता नष्ट होते.

आज भारत पाक नेपाळ मालदीव श्रीलंका म्यानमार मध्ये विशिष्ट विचारसरणीचे लोक व पक्ष ही अति उजव्या राजकारणाला बळ व आकार देत आहेत.

**वांशिक संघर्ष**

काही आशियाई देशात वांशिक संघर्ष उफाळून आला आहे. उदा. म्यानमारमधील रोहिंग्यांचा प्रश्न, म्यानमारच्या जुटा लष्कराने गेल्या काही वर्षात म्यानमार मधील लोकशाही शासन प्रणाली उध्वस्त करित आणली. अल्पसंख्यांकांना विस्थापित केले त्यामुळे लाखो लोकांची हत्याकांड झाली स्थलांतरांचा प्रश्न बिकट बनला.

**लष्करी हस्तक्षेप व वर्चस्व:**

आशियाई देशातील ज्या देशाची लष्कर हे शक्तिशाली आहे, त्या लष्कराने संबंधित देशाची सत्ता ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला आहे, अथवा विकसित राष्ट्रांच्या मदतीने विद्यमान सरकार उलथवून टाकले आहे. लष्कर जेव्हा राजकारभारात हस्तक्षेप करते तेव्हा त्या देशातील लोकशाही धोक्यात येते. उदा. पाकिस्तान, बांगलादेश, म्यानमार.

**चीनचा नवसाम्राज्यवाद व अरेरावी :**

आज चीन हा आशियातील सर्वात बलाढ्य लष्कर व प्रचंड आर्थिक औद्योगिक व्यापारी बळ असणारा विकसित देश आहे. चीनचा जवळपास सर्वच देशांशी सीमावाद आहेत. तैवान, कोरिया, जपान, भूतान, नेपाळ, भारत, फिलिपाईन्स हाँगकाँग या सर्व देशांशी चीन संघर्ष करित आहे, अरेरावी करित आहे. १९५९ साली* चिन्हे तिबेट बळकावला. आता भूतान, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, लडाख या भूभागाला गिळंकृत करण्यासाठी चीन लष्करी मार्गाचा वापर करित आहे.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत शोधनिबंधाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे

१) आशियाई देशात SAARC, SCO, BIMSTEC, QUAAD, BRICKS, NAAM, ASEAN या प्रादेशिक गटांचा प्रभाव आहे.
२) USSR च्या विभाजनानंतर (१९९१) आशियात १५ नवीन राष्ट्रे जन्मास आली.
३) आशिया खंडात दुसऱ्या महायुद्धानंतर मोठ्या प्रमाणावर नवस स्वतंत्र राष्ट्रांचा जन्म झाला.
४) USA, चीनला रोखण्यासाठी आशियात भारत, जपान या राष्ट्रांना अधिक सहकार्य करित आहे.
५) आशिया खंडात MNC कंपन्या बाजारपेठ कच्चामाल व भांडवल गुंतवणुकीसाठी शासन प्रणाली, संसद, राजकीय पक्षांमध्ये हस्तक्षेप करित आहेत.
६) आशियाई देशात युरोपियन राष्ट्राने पुरस्कृत केलेल्या अनेक NGO शासन संस्थेत हस्तक्षेप करित आहेत. उदा Human Rights Watch, Amnesty International, Green Peace
७) आशियातील लोकशाहीला सर्वात मोठा धोका हा गरिबी, दारिद्र्य, बेकारी, जमातवाद, मूलतत्त्ववाद, धर्मांधता व स्वार्थी भांडवलशाहीचा आहे.
८) लोकशाही शासनप्रणाली विशेषत: आशियातील ही अपरिपक्व, सुमार व निष्कृष्ट दर्जाची बनत चालली आहे.
९) आशियातील लोकशाहीला खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरणातून घुसखोरी केलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांच्या धोरणांचा फार मोठा धोका आहे. उदा. BOT, BOLT, PPP तत्व

**शिफारशी :**

१) आशियाई राष्ट्रांनी आपापसात एकजूट दाखवावी व पाश्चिमात्य देशांचा हस्तक्षेपावर मर्यादा घालाव्यात.
२) आशियाई देशाने स्वतःचे नेतृत्व हे पुरोगामी, प्रागैतिक व सुधारणावादी स्वरूपाचे ठेवावे. जनतेने काळजीपूर्वक गांभीर्याने लोकनेता निवडावा.
३) भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीने आशिया खंडात सर्वसमावेशक नेतृत्व व विश्वास संपादन करावा.
४) पाकिस्तान हे राष्ट्र SAARC च्या अपयशाला कारणीभूत आहे. त्यामुळे SCO व SAARC मधून पाचला कायमची बरखास्त करावे, बहिष्कृत करावे.
५) भारताला UNO व SC चे स्थायी सदस्यत्व मिळावे.
६) IOC, EU, AU या गटाने आशियात स्थैर्य शांतता व विकासासाठी सहकार्य करावे.
७) UNO, WHO, ILO, UNICEF, INTERPOL, ICJ यांनी आशियातील दंगली, हिंसाचार, यादवी, अत्याचार यांना आळा घालावा, तटस्थ धोरण घ्यावे.

**संदर्भ :**

१) A new deal for Asia महारथी मोहम्मद, first November १९९९ pleleanduk Publish
२) Asian Drama - गुन्नार मीर्दाल
३) आशिया खंडातील आधुनिक महाभारत, रावसाहेब पटवर्धन, पुणे, १९७४.
४) राज्यशास्त्र पाठ्यपुस्तक, इयत्ता ११ वी.